# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.01.2026** **वार- मंगळवार**

---

**निवडणूक जाहीर**

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. ५ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार असून मतमोजणी ७ फेब्रुवारी रोजी होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. यामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समितीच्या निवडणुका आयोगाने आज जाहीर केल्या. जिल्हा परिषदेच्या निवडणुका दोन टप्प्यात होणार असून १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. या निवडणुकांसाठी १६ जानेवारी पासून अर्ज भरायला सुरुवात होईल आणि २१ जानेवारीपर्यंत अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. उमेदवारांना ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरावे लागतील. या निवडणुकीत EVM चा वापर होणार आहे. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीच्या गणासाठी १ अशी दोन मते द्यावे लागतील. या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाने ५० टक्क्याने मर्यादा ओलांडली नसल्याने ही निवडणूक घेण्याची मुभा सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे.

**फडणवीस**

दरम्यान राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठीचा प्रचार आज संपला आहे. सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी आणि उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला.

पुणे शहरात यापूर्वीच्या काळात भविष्याचा विचार न करता कामे करण्यात आल्याने काही पूल पाडावे लागले. पण गेल्या पाच वर्षात भाजपने पुढील वीस वर्षांचा विचार करून काम करण्यास सुरुवात केली आहे. त्याचा पुणेकरांना चांगला फायदा होतोय असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुणे महापालिका निवडणुकीतील शेवटची प्रचार सभा मुख्यमंत्र्यांनी आज गोखलेनगर इथं घेतली त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुण्याला गतिमान करण्यासाठी 23 नवीन उड्डाणपूल बांधण्याबरोबरच 32 रस्ते उत्तम दर्जाचे केले जाणार आहेत.त्याचबरोबर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी जमिनीखालून रस्ते तयार करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत उमेदवारांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी जाहीर सभा घेतली. तसेच त्यांनी पुणे शहर आणि परिसरात पवार यांनी रोड शो मध्ये सहभाग घेतला.

**सुट्टी**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी 15 जानेवारी रोजी मतदान होणार आहे. मतदान केंद्र म्हणून निश्चित करण्यात आलेल्या इमारतींमध्ये सुट्टी जाहीर करण्यात आल्याचं पुणे महापालिका प्रशासनाने जाहीर केलं आहे. ज्या इमारतींमध्ये मतदान केंद्र निश्चित करण्यात आलं आहे. त्या इमारतींमध्ये उद्या; मतदान पूर्वतयारीचा दिवस आणि १५ जानेवारी मतदानाचा दिवस या कालावधीत निवडणूक विषयक कामकाजाव्यतिरिक्त इतर सर्व नियमित कामकाज बंद ठेवण्यात येणार आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असा इशारा पुणे महापालिका प्रशासनाने दिला आहे. दरम्यान , निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात मतदानाच्या दिवशी १२ हजार पोलिसांचा बंदोबस्त

ठेवण्यात आला असून मतमोजणीच्या दिवशीदेखील पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे.

**<u>रिट-शिवराज</u>**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत वॉर्ड क्रमांक ९ बाणेर-सूस-पाषाण मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बाबुराव चंदेरे यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात गुन्हेगारी प्रकरणांची माहिती लपवल्याचा आरोप करत, त्यांचे नामांकन रद्द करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार गणेश कळमकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. चंदेरे यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात गंभीर स्वरूपाच्या प्रलंबित गुन्हेगारी प्रकरणांची माहिती लपवून प्रशासनाची आणि मतदारांची दिशाभूल केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

**<u>पदवीधरशिक्षक</u>**

पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या नव्याने मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत विभागीय आयुक्त आणि मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते  अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या यादीनुसार पुणे विभागात ३ लाख १० हजार ९६४ पदवीधर तर ५१ हजार ९७९ शिक्षक मतदार आहेत. या नंतरदेखील मतदार नोंदणी निरंतर सुरू राहणार असून पात्रता धारकांनी नोंदणी करावी, असं आवाहनदेखील पुलकुंडवार यांनी केलं आहे.

**<u>पुणेग्रँडटूर</u>**

पुणे ग्रँड टूरमुळे ग्रामीण पर्यटनाला चालना मिळणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलण्यास मदत होणार असल्याचं प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केलं  आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात बांधले गेलेले रस्ते केवळ स्पर्धेपुरते नसून येणाऱ्या काळामध्ये त्यांची गुणवत्ता कायम राखण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. तसेच या रस्त्यांमुळे ग्रामीण शेती उत्पादने नियोजित वेळेत इच्छित स्थळी पोहोचण्यास मोठी मदत होत आहे. शेतकरी उत्पादकांना या रस्त्यांमुळे मोठी मदत मिळत आहे असं सांगताना ग्रामीण भागात सायकलिंग या क्रीडा प्रकाराची एक चळवळ निर्माण होणार असल्याचंही डूडी यावेळी म्हणाले.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**